226

# महात्मा गांधींचे विचार आणि २१ वे शतक

**श्री डॉ.डोंगरे एल.बी.**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड

महात्मा गांधी हे एक नांव नसून तो एक विचारप्रवाह आहे. जगातील सर्व समस्यांची उत्तर म्हणजे गांधीवाद आहे. विश्वातील मानवी कल्याणाचा, विश्वशांतीचा, नितीमत्तेचा, अहिंसेचा, सत्याचा विचार मांडणाऱ्या विचारवंतामध्ये महात्मा गांधी अग्रणी आहेत. २१ व्या शतकात ज्या विचारांने संपूर्ण जगाला प्रभावीत केले आहे तो विचार म्हणजे गांधीवाद आहे. गांधीवाद हा असत्याकडून सत्याकडे, अनैतिकतेकडून नैतिकतेकडे, स्वार्थाकडून निस्वार्थाकडे, हिंसेकडून अहिंसेकडे, युध्दाकडून शांतीकडे नेणारा विचार आहे. गांधीवाद संपूर्ण विश्वात सामान्य माणसाचे कल्याण आणि सुखाची, शांतीची निर्मितीकरुन मानवी मुल्यांवर आधारीत समताधिष्ठेची समाजाची मांडणी करणारा विचार आहे. २१ व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानाने नेत्रदिपक अशी प्रगती केली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात अमुलाग्र असा बदल झाला आहे. या बदलामुळे मानवी जीवनात अध्यात्माऐवजी चंगळवाद, नैतिकतेऐवजी अनैतिकता, अहिंसेऐवजी हिंसा, सत्याऐवजी असत्याचा, मानवतावादाऐवजी दहशतवादाचा, धर्मनिरपेक्षतेऐवजी धर्मांदता वाढीस लागली आहे. त्यामुळे मानवी जीवन भौतिकवादी, चंगळवादी, यांत्रीकी स्वरुपाचे बनले आहे. २१ व्या शतकात निर्माण झालेल्या सामाजिक समस्यामुळे प्राण्यांपासून भिन्न असलेला मनुष्य हा प्राणी बनत गेला. अशा यांत्रीकी, अतिरेकी, भौतिकवादी, चंगळवादी समाजाला संस्कार आणि विचार देण्याचे कार्य महात्मा गांधी सारख्या महापुरुषांनी केले आहे.

महात्मा गांधी यांनी अहिंसा या मानवी मुल्यांचा विचार मांडला आहे. कुठल्याही प्रकारची हिंसा निषीद्ध मानली आहे. २१ व्या शतकात हिंसा, अराजकता, शोषण वाढले आहे. या हिंसेवर मात करण्यासाठी महात्मा गांधींचा अहिंसावादी विचार महत्त्वाचा आहे. अहिंसेबाबत महात्मा गांधी म्हणतात 'अहिंसा ही केवळ व्यक्तिगत नसून ती सामाजिक आहे. तेंव्हा इतर गुणा प्रमाणेच त्याचा परिपोषण व्हावा. समाजाचे अधिकांश नियमन अहिंसा प्रदान असते म्हणून मला वाटते की, ते देशव्यापी किंवा विश्वव्यापी बनावे.' समाजात शांतता सदाचार विश्वकल्याणासाठी अहिंसा हे मानवी मुल्य कसे महत्वाचे आहे. हे पटवून देण्याचे महत्वाचे कार्य महात्मा गांधींनी केले. २१ व्या शतकात महात्मा गांधींच्या अहिंसा या विचाराचे

महत्वाचे अधोरेखीत करुन संयुक्त राष्ट्रसंघाने महात्मा गांधी यांचा २ ऑक्टोंबर हा जन्मदिवस जागतिक अहिंसा दिन म्हणून साजरा करण्याचे घोषीत केले. महात्मा गांधींनी अहिंसा हा विचार सांगीतला नाही तर ते स्वत:च्या व्यक्तिगत जीवनात त्याचे अनुसरन केले. म्हणून ते अहिंसा या विचाराचे महान पुजारी होते.

२१ व्या शतकातील विज्ञान तंत्रज्ञानाच्या आमुलाग्र परिवर्तनाने राष्ट्रा-राष्ट्रातील, लोकां-लोकांतील अंतर कमी होवून जग हे एक ग्लोबल व्हिलेज बनले आहे. विश्वाची नेत्रदिपक अशी औद्योगिक, वैधानिक, भौतिक प्रगती झाली असली तरीही मानवाची नैतिक अधोगती झाली आहे. महात्मा गांधींच्या विचारांचा केंद्रबिंदू असलेला मानव हा मुक कंगाल, गरीबी, बेकारी, दारिद्रय, भ्रष्टाचार, प्रदुषण, अन्याय, अत्याचार यामुळे एका विनाशाच्या वळणावर येवून पोहचला आहे. या विनाशाचे भाकीत महात्मा गांधींनी केले होते. हिंद स्वराज्य मध्ये महात्मा गांधींनी डॉक्टर, वकील, रेल्वे या तिन बाबींना विरोध केला होता. ज्या बाबीला नैतिक अधिष्ठान नाही अशा सर्व बाबींना महात्मा गांधीजींनी विरोध केला होता. म्हणून विश्वातील सध्यकालीन सर्व समस्यांचे उत्तर महात्मा गांधींच्या विचारात दिसून येते. औद्योगिकरण, यांत्रीकीकरण, साम्राज्यवाद, दहशतवाद, सांप्रदायिकता, नक्षलवाद, चंगळवाद या सर्व समस्यांचे विश्लेषण महात्मा गांधीजींनी हिंद स्वराज्य मध्ये केले आहे. महात्मा गांधी यांनी हिंद स्वराज्य मध्ये जहाल आणि मवाळ या दोन्ही मार्गाच्या व्यतिरीक्त एक मध्यम मार्ग शोधला आहे तो सत्य, अहिंसा आणि नैतिकतेवर आधारीत आहे. महात्मा गांधींनी आपल्या विचारातून औद्योगिकीकरणाला, यांत्रिकीकरणाला विरोध केला आहे. यांत्रिकीकरणातून गरीबी, बेकारी यासारख्या सामाजिक समस्या निर्माण होतील असे गांधीजींना वाटत होते. म्हणून गांधीजींनी मोठमोठया यंत्र आणि उदयोगांऐवजी लहान-लहान यंत्र आणि उद्योगांचे समर्थन केले होते. यांत्रिकीकरणामुळे नितीमुल्यांचा ऱ्हास, लहान-लहान उदयोगांचे अस्तित्व धोक्यात येते चंगळवादी जीवन वाढीस लागते. म्हणून महात्मा गांधींनी २१ व्या शतकातील यांत्रीकीकरणाला विरोध करुन मानवतावादी, नितीवादी उपभोगवादाऐवजी परस्परावलंबनाचा विचार मांडला. २१ व्या शतकातील यांत्रीक युगाने व्यक्ती व समाजाला दुर्बल व अशक्त बनविले आहे.

महात्मा गांधींनी भांडवलशाहीला विरोध केला होता. भांडवलशाही व्यवस्था हे समाजाच्या शोषणाचे प्रतिक आहे. समाज कल्याण हा भांडवलदाराचा मुळ उद्देश असत नाही. तर नफा कमवणे हा असतो. भांडवलदार नफा कमवण्यासाठी कोणत्याही अमानवी, अनैतिक, हिंसात्मक मार्गाचा अवलंब करतो. २१ व्या शतकात भांडवलशाही व्यवस्था नष्ट होण्याऐवजी जागतिकिकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या माध्यमातून अधिक मज़बूत होतांना दिसून येते. आज समाजात भांडवलदार आपल्या बळाचा, शोषणाचा, हिंसेचा, अनितीचा अवलंब करुन शोषण करतांना दिसून येतो. म्हणून महात्मा गांधींनी भांडवलशाहीला विरोध करुन शोषण मुक्त समताधिष्ठित समाजाचा विचार मांडला होता. महात्मा गांधी यांनी विश्वशांती बाबत अभिनव असे चिंतन केले होते. मानवी हितसंबंधाच्या अंतर विरोधामुळे विश्वातील शांततेला अनेकदा तडे गेले आहेत. प्रथम महायुध्द, व्दितीय महायुध्द, साम्राज्यवाद, दहशतवादाच्या माध्यमातून जागतिक शांततेपुढे एक मोठे आव्हान उभे केले आहे. या आव्हानाला पेलण्याचे सामर्थ्य गांधी विचारामध्ये दिसून येते. शस्त्राचे उत्तर शस्त्राने न देता तो आत्मबळाच्या आधारावर समाजाच्या शाश्वत सुखांचा संकल्पनेचा समन्वय साधणारी आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी गांधीजींनी उदात्त विश्वशांतीचा विचार मांडला. भगवान बुध्दानंतर शांततेचा विचार प्रभावी मांडण्याचे काम महात्मा गांधीजींनी केले. म्हणून २१ व्या शतकामध्ये गांधी विचारांशिवाय पर्याय दिसून येत नाही.

22

**निष्कर्ष :–**

भारतातील सर्व महापुरुषांनी मानवी जीवन सुखी व सुंदर व्हावे यासाठी आदर्श असे विचारधन मांडले आहे. परंतु २१ व्या शतकात महापुरुषांनी सांगीतलेल्या जीवनमुल्यांचा विसर समाजाला पडला असे दिसून येते. पैसा, प्रसिध्दी, पद हे आजच्या प्रत्येक व्यक्तीचे जीवनमुल्य होवू लागले आहे. म्हणून गांधींनी सांगीतलेला सत्य, अहिंसा, नैतिकता, शांतता, हिंद स्वराज्य, अध्यात्मवाद, धर्मनिरपेक्षता हे विचार केवळ आदर्शापुरते सिमीत झाल्याचे दिसून येते. आज सर्वत्र भ्रष्टाचार, स्वार्थ, तत्वहिनता, चंगळवाद, अविश्वास, अशांतता, व्देष, विकृत राजकारण, महापुरुषांचा राजकीय स्वार्थासाठी वापर होतांना दिसून येतो आहे. २१ व्या शतकात महापुरुषांचा आचार विचार संपवला जात आहे. म्हणुन महापुरुषांचा पराभव होतो आहे. असे दिसून येते. महापुरुषांचा पराभव हा एकदा त्यांच्या वैऱ्यांकडून होतो आणि दुसऱ्यांदा अनुयायांकडून होतो. महात्मा गांधी आणि त्यांनी मानलेला विचार २१ व्या शतकातील समाज यामध्ये विसंगती दिसून येते. म्हणुन महात्मा गांधींजीचा विचार हा आचरणात आणल्याशिवाय गांधींजींना अभिप्रेत असलेला समाज निर्माण होवू शकत नाही. म्हणुन २१ व्या शतकामध्ये गांधी विचाराशिवाय दुसरा पर्याय नाही.

**संदर्भसूची –**

१) गांधींजींची ओळख – पन्नालाल सुराना, सुगावा प्रकाशन, पुणे.
२) गांधी विचार – डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड.
३) महापुरुषांचा पराभव – प्रा.विष्णू सुर्वे, अक्षरदिप प्रकाशन, कोल्हापुर.
४) लोकराज्य – ऑक्टोंबर २०१५.
५) योजना – ऑक्टोंबर २०१५

****

हिंदी विभाग
महा.प्राध्यापक एवं शोधनिर्देशक
हु.ज.पा.महाविद्यालय हिमायतनगर